मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोठया प्रकल्पांसाठी महापालिका घेणार आयआयटीचा सल्ला

**महापालिकेच्या वतीने अनेक मोठे व खर्चिक प्रकल्प हाती घेण्यात आले : प्रकल्पांसाठी सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापक, आर्किटेक्ट यांच्यावर कोट्यवधींचा खर्च**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने अनेक मोठे व खर्चिक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. या प्रकल्पांसाठी सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापक, आर्किटेक्ट यांच्यावर कोट्यवधींचा खर्च करूनही प्रकल्पांमध्ये त्रुटी राहत असून, प्रकल्प रखडत आहेत. त्यामुळे कामांची गुणवत्ता, दर्जा आणि सुरक्षितता राखली जावी म्हणून महापालिकेने मोठ्या व महत्वाच्या प्रकल्पांसाठी मुंबई आयआयटीचे सहाय्य घेण्याचे निश्चित केले आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या प्रत्येक मोठ्या व महत्त्वाच्या प्रकल्पासाठी मुंबई आयआयटीतील तज्ञांचा सल्ला घ्यावा लागणार आहे.




शहरात महत्वाचे आणि अधिक खर्चाचे प्रकल्प व विकासकामे सुरू आहेत. विविध कारणांमुळे ती कामे रखडत आहेत. तसेच, कामाचा दर्जा घसरल्याचे आरोप महापालिकेवर सातत्याने होत आहेत. त्यामुळे महापालिकेची नाहक बदनामी होत आहे. सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापक, आर्किटेक्ट तसेच, सिटी ट्रॉन्सर्मेशन ऑफीस (सीटीओ) आदींवर कोट्यवधी रूपयांचा खर्च करूनही असे प्रकार सातत्याने घडत आहेत. काही कामांची गुणवत्ता तपासणी पुण्यातील सीओईओपीकडून करून घेण्यात येत आहे.

असे असताना आता मुंबई आयआयटीच्या तज्ज्ञांचा आधार घेण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. तब्बल १३ वर्षांपासून महापालिकेचा पवना बंद जलवाहिनी प्रकल्प बंद स्थितीत पडून आहे. राज्य शासनाने त्या कामावरील स्थगिती ८ सप्टेंबर २०२३ ला उठविली आहे.

> महापालिकेने पवना बंद जलहिनीचा नवा डीपीआर तयार केला आहे. डीपीआर मुंबई आयआयटी या त्रैयस्थ संस्थेकडून तपासून घेण्यात येत आहे. त्यांच्याकडे मागील आठवड्यात डीपीआर पाठविला आहे. तेथील तज्ञ मंडळींकडून त्याची तपासणी केली जाईल. त्यांनी काही सूचना केल्यास त्यानुसार डीपीआरमध्ये बदल केले जातील.
>
> - अजय सुर्यवंशी, सहशहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महापालिका


> महापालिकेचा छत्रपती संभाजी महाराज स्मारक हा महत्वाचा प्रकल्प आहे. मोशी येथे महाराजांचा १०० फूट उंचीचा कांस्यधातूचा पुतळा उभारण्यात येत आहे. त्याची सुरक्षा महत्वाची आहे. सुरक्षेत त्रुटी राहू नये म्हणून मुंबई आयआयटीच्या तज्ज्ञांकडून पुतळ्याची तपासणी करून घेण्यात येणार आहे. आयआयटीचे अत्याधुनिक व प्रगत तंत्रज्ञान आहे.
>
> - मकरंद निकम, शहर अभियंता

# नाकाबंदी कारवाईत सापडली 14 लाखांची रोकड

**पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी करण्यात येत आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. यात चार कारवायांमध्ये पोलिसांनी १४ लाख ३७ हजार ८०० रुपयांची रोकड जप्त केली.



गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाच्या विशेष नाकाबंदी दरम्यान शुक्रवारी (दि. ८) पहाटे अडीचच्या सुमारास एक संशयित चारचाकी वाहन कृष्णानगर चौक येथे अडवण्यात आली. वाहनाची तपासणी केली असता वाहनात असणारे सुमित नितीन धुमाळ (२३, रा. साने चौक, चिखली), अविनाश माधव कांबळे (२३, रा. आळंदी) यांच्याकडे एक लाख ५१ हजार ५०० रुपयांची रोकड मिळाली. याबाबत विचारले असता समाधानकारक उत्तरे न दिल्याने रोकड जप्त केली.

दुसऱ्या कारवाईत सोमाटणे टोलनाका येथे गुन्हे शाखा युनिट पाचच्या पथकाकडून गुरुवारी (दि. ७) वाहन तपासणी सुरू होती. त्यावेळी एका संशयित वाहनाची तपासणी केली. त्यामध्ये असणारे विजय मारुती मांडुळे (२९, रा. थोरम, करंजगाव, ता. मावळ) व संकेत वाडेकर (२३, रा. तुंगार्ली, लोणावळा) यांच्याकडे दोन लाखांची रोकड मिळाली. याबाबत कागदपत्रे सादर न केल्याने रोकड जप्त केली. तसेच पुढील कारवाईसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली.

तिसऱ्या कारवाईत थरमॅक्स चौकात निगडी पोलिस ठाण्याच्या तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे गस्तीवर असताना दोन व्यक्तींजवळ १० लाख एक हजार रुपये रोख रक्कम मिळून आली. ही रोकड पोलिसांनी ताब्यात घेतली.

चौथ्या कारवाईत तळेगाव दाभाडे पोलिसांकडून गुरुवारी (दि. ७) सोमाटणे टोल नाका येथे वाहन तपासणी सुरू होती. त्यावेळी एका चारचाकी वाहनाची तपासणी केली. वाहनातील अक्षय रामदास आटोळे (१९, रा. सांगवी) याच्या ताब्यात ८५ हजार २३० रुपये मिळून आले. ती रोकड तळेगाव दाभाडे पोलिसांच्या पथकाने ताब्यात घेऊन निवडणूक कक्षाकडील भरारी पथकाच्या ताब्यात दिली.

# पिंपरी चिंचवड शहरातील मजूर अड्ड्यावर मतदान जनजागृती

**महापालिकेच्या उपस्थित अधिकाऱ्यांनी मजुरांकडून मतदान करण्याबाबत शपथ**

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यासाठी नुकतेच पथनाट्य आयोजित करण्यात आले होते. मतदारांमध्ये भाग घेण्याबाबत तसेच, कवितेच्या माध्यमातून त्यांना मतदानासाठी आवाहन करण्यात आले. यावेळी महापालिकेच्या उपस्थित अधिकाऱ्यांनी मजुरांकडून मतदान करण्याबाबत शपथ घेतली. मानवी हक्क संरक्षण आणि जागृती तसेच पिंपरी चिंचवडच्या ह विभागातील आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.



नागरी समस्या जाणुन घेणारे अभ्यासू उमेदवार निवडून देण्यात यावेत, नागरी समस्या विधानसभेत मांडल्या जातील यासाठी जनजागृती मध्ये नागरिकांना आवाहन केले. मतदान सर्वश्रेष्ठ काम. घ्या मातृभुमीची आण ,करा मतदान.आपलं मत, विकासाला मत, मतदान राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो अशा विविध प्रकारच्या घोषणेद्धारे संवाद साधला. कवि आत्माराम हारे यानी कविता सादर करून मतदान करण्याचे आवाहन केले.

पिंपरी चिंचवड शहरांमध्ये विविध मजूर अड्डे आहेत. या ठिकाणी सकाळी विविध भागातील अनेक मजूर कामासाठी एकत्र येतात. त्यांचे विविध प्रश्न आहेत. संघटनेच्या वतीने या मजुरांशी संवाद साधण्यात आला. त्यावेळी त्यांना लोकशाही बाबत माहिती देऊन मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. याबाबत अनेक मजुरांनी देखील मतदान आवर्जून करण्यात असल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित नागरिकांना ह प्रभाग समुह संघटक वैशाली लगाडे यांनी मतदान करण्याची शपथ मजुरांना दिली. संस्थाध्यक्ष विकास कुचेकर, शहराध्यक्ष आण्णा जोगदंड, संगिता जोगदंड, आरोग्य निरीक्षक उद्धव ढवरी, वैशाली लगाडे, शंकर नाणेकर, कवयित्री जयश्री गुमास्ते, कवी आत्माराम हारे, लक्ष्ण जोगदंड, आरोग्य मुकादम, विनोद कांबळे , मुरलीधर दळवी, सचिव गजानन धाराशिवकर , स्नेहल सोनवणे, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे सचिव ईश्वरलाल चौधरी उपस्थित होते.

# खराडी-शिवणे रस्ता कधी होणार?

## नदीपात्रातील प्रकल्प गेल्या 13 वर्षांपासून कागदावरच वडगाव शेरी मतदारसंघातील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर असताना उदासिनता

**पुणे | प्रतिनिधी**

वडगाव शेरीतील नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे. तासन् तास वाहतूक कोंडीत अडकून पडण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या रस्त्यावरील बीआरटी मार्ग अर्धवट काढण्यात आला आहे. मात्र त्यामुळे फारसा फरक पडलेला नाही. दुसरीकडे पर्ययी मार्ग म्हणून नदीपात्रातील खराडी ते शिवणे रस्त्याकडे मात्र दुर्लक्ष करण्यात आले असून हा रस्ता गेल्या १३ वर्षांपासून कागदावरच आहे.



### पर्यायी रस्ता कसा महत्वाचा?

» वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी १९८७च्या विकास आराखड्यामध्ये शिवणे ते खराडी नदीकाठचा २२.५० किलोमीटर रस्ता करण्याचा प्रस्ताव होता.
» वाहतूक कोंडी सोडवण्याच्या दृष्टीने हा महत्वाचा रस्ता आहे.
» रस्ता करण्यासाठी पुणे महापालिकेने २०११ मध्ये ३५६ कोटींची निविदी काढली होती.
» रस्त्याचे काम शिवणे ते म्हात्रे पूल (६ किमी), म्हात्रे पूल ते संगमवाडी (५ किमी) आणि संगमवाडी ते खराडी (११.५०) किमी असे एकूण तीन टप्प्यामध्ये डिफर्ट पध्दतीने करण्यात येणार आहे.
» हा रस्ता १०० फुटी असणार आहे.
» त्यामध्ये दोन्ही बाजूला फूटपाथ, सायकल ट्रॅक, सबवे आदींचा समावेश आहे.
» वर्षामध्ये हा रस्ता तयार करण्याचे नियोजन होते. मात्र, रस्त्यासाठी भूसंपादनाचे वेळेवर झाले नाही.

### भूसंपादन आणि तांत्रिक बाबींमुळे विलंब

» वडगाव शेरी ते कल्याणीनगर या रस्त्याचे १.२ किलोमीटर भूसंपादन रखडले आहे. भूसंपादनाचे काम जिल्हाधिकारी कार्यालयाकडे आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यालयातून तांत्रिक गोष्टीवर निर्णय घेतल्यास कल्याणीनगर ते येरवडा हा रस्ता सुरू होईल. हा रस्ता करण्यासाठी प्राधान्याने लक्ष दिले जात आहे. पण, भूसंपादन आणि अनेक तांत्रिक गोष्टीमुळे वेळ लागत आहे, असे पथ विभागाने 'सीविक मिरर'ला सांगितले.

शहरातील मुख्य रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पर्यायी रस्ते आणि मिसिंग लिंक शोधण्याचे काम महापालिकेकडून तसेच सरकारकडून केले जात आहे. या भागातील लोकसंख्या वेगाने वाढत आहे. तशी नगररोडवरील वाहनाची संख्या वाढली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याची बाब ठरत आहे. या रस्त्याला पर्यायी रस्ता आतापर्यंत होणे गरजेचे होते. हीच गरज ओळखून नदीपात्रातून खराडी ते शिवणे रस्त्याची आखणी करण्यात आली. रस्त्याचे कामदेखील सुरु करण्यात आले. मात्र भूंसपदानाअभावी रस्ता अर्धवट स्थितीत आहे.

येरवडा ते खराडी यादरम्यान वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढत आहे. या प्रकल्पातील खराडी ते मुंढवा पुलादरम्यान रस्ता झाला आहे. पण पुढे वडगाव शेरी ते येरवडा हा रस्ता भूसंपादन आणि तांत्रिक अडचणीत अडकला आहे. नदीपात्रातील रस्ता पूर्ण केल्यास खराडी ते येरवडादरम्यान वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होणार आहे. परंतु या रस्त्याच्या कामाला अनेकदा मुदतवाढ देण्यात आली आहे.

सुमारे १० वर्षांपासून या रस्त्याचे काम सुरू आहे. आजअखेर या रस्त्यासाठीद ५० टक्के भूसंपादन झाले आहे. उर्वरित ५० टक्के भूसंपादनासाठी जागामालकांना नोटीस देण्यात आल्या आहेत. या रस्त्याच्या तिसऱ्या टप्प्यातील खराडी ते संगमवाडी या ११.५ किलोमीटर रस्त्यापैकी सुमारे साडेसहा किलोमीटर जागेचे भूसंपादनाचे झाले आहे. खराडी गाव ते मुंढवा पुलादरम्यान रस्ता पूर्ण होऊन वाहतूकीसाठी खुला झाला आहे. उर्वरित संगमवाडी ते गुंजन चौक (४ किमी), गुंजन चौकामध्ये (५०० मी) आणि वडगाव शेरी ते खराडी या भागातील (१ किमी) जागेचे भूसंपादन बाकी आहे. भूसंपादन होत नसल्याने रस्त्याचे काम रखडले आहे.

# सोशल मीडियाच्या माध्यमातून उमेदवारांचे कॅम्पेनिंग

## प्रचारयंत्रणेचे तंत्रही बदलले असून, सगळ्याच उमेदवारांची भिस्त सोशल मीडियावर अवलंबून

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, उमेदवारांनी पदयात्रा, मतदारांच्या भेटीगाठींचा धडाका सुरू केला आहे. त्याचबरोबर गेल्या काही वर्षांत प्रचारयंत्रणेचे तंत्रही बदलले असून, सगळ्याच उमेदवारांची भिस्त सोशल मीडियाच्या अवलंबून असल्याचे चित्र आहे. त्यामुळे उमेदवारांनी सोशल मीडिया फ्रेंडली असलेल्या तरुणाईच्याच हातात प्रचाराची सूत्रे दिली आहेत. त्यामुळे तरुणांना रोजगाराची नवी संधी उपलब्ध झाली आहे.



मागील लोकसभा निवडणुकांपासून ते आत्ताच्या विधानसभा प्रचारात तरुणांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. लोकशाहीच्या उत्सवात त्यांचा सहभाग ही सकारात्मक बाब आहे. जवळपास सर्वच नागरिकांकडे स्मार्टफोन उपलब्ध असल्याने उमेदवारांचे म्हणणे प्रत्यक्ष मतदारापर्यंत पोहोचत आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात प्रचारासाठी मेसेजेस, टेलिकॉलिंगचा वापर होत आहे.

कमीत कमी कालावधीत जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी टेलिकॉलिंग प्रभावी ठरत असल्याने सर्वच पक्षांचे उमेदवार या यंत्रणेचा वापर करत आहेत. एका विधानसभा कार्यक्षेत्रात साधारण ६० ते ८० जणांची टीम टेलिकॉलिंगसाठी नेमली जाते. त्या माध्यमातून पक्षाचे नाव, चिन्ह, उमेदवाराबद्दल माहिती, निवडणुकीची तारीख, व्होटिंग मशिनवर उमेदवाराचा बटण क्रमांक अशी विविध माहिती दिली जाते.

दिवसाला साधारणतः २५० ते ३०० मतदारांना फोन करून ही माहिती दिली जाते. टेलिकॉलिंगसाठी तरुणींना प्राधान्य दिले जात आहे. साधारण २० ते ३० दिवसांसाठी १५ ते २० हजार रुपये दिले जातात. त्यामुळे निवडणुकीच्या काळात उच्चशिक्षित तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे.

मतदानाच्या दिवसापूर्वी प्रत्येक मतदारापर्यंत व्होटर स्लिप पोहोचावी, यासाठी उमेदवारांकडून काळजी घेतली जाते. एका विधानसभा मतदारसंघात व्होटर स्लिप वाटपासाठी कार्यकर्त्यांसह ४० ते ५० लोकांची आवश्यकता असते. त्यांना दिवसाला ३०० ते ५०० रुपये मानधनापोटी दिले जातात.

# शालेय विद्यार्थी आणि नवसाक्षर घालणार मतदारांना भावनिक साद

## मतदान जनजागृतीसाठी व्हिडिओ निर्मिती पत्रलेखनासाठी दोन मुख्यगट करण्यात आले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात २० नोव्हेंबरला मतदान होत आहे. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी योजना शिक्षण संचालनालयाने शालेय विद्यार्थी व नवसाक्षर यांच्यासाठी व्हिडिओ निर्मिती आणि कौटुंबिक पत्रलेखन उपक्रम आयोजित केले आहेत.



मतदान जनजागृतीसाठी व्हिडिओ निर्मिती पत्रलेखनासाठी दोन मुख्यगट करण्यात आले आहेत. यात शालेय विद्यार्थी गटात इयत्ता ५ वी ते ८ वी, इयत्ता ९वी ते १२ वी असे उपगट आहेत. दुसरा नवसाक्षरांचा गट आहे. दोन्ही गटाच्या उपक्रमांसाठी आई-बाबा, आजी-आजोबा, काका-मावशी, मामा-मामी मतदान करायचं हं! असा विषय देण्यात आला आहे.

### प्रशस्तीपत्रे वितरित करणार...

» शाळा, तालुका, जिल्हा स्तरावर या दोन्ही उपक्रमात सर्वोत्कृष्ट प्रत्येकी पाच पत्रे आणि व्हिडिओ निर्मितीसाठी प्रशस्तीपत्रे निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर वितरित करण्यात येणार आहेत, अशी माहिती शिक्षण उपसंचालक राजेश क्षीरसागर यांनी दिली आहे.

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय सरासरीपेक्षा महाराष्ट्रात कमी मतदान झाले होते. त्यामुळे राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर योजना शिक्षण संचालनालयाने आयोजित केलेले दोन्ही उपक्रम अनोखे आहेत. योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी सर्व जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना याबाबत पत्राद्वारे याबाबत सूचना दिल्या आहेत.

कौटुंबिक पत्रलेखन सध्याच्या काळात मागे पडले आहे. त्याचा सराव व्हावा आणि मतदान जागृती व्हावी असे दोन्ही उद्देश ठेवून पत्रलेखन व व्हिडिओ निर्मिती या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कौटुंबिक पत्रलेखन द्वारे विद्यार्थी आई-वडिलांना घरातच समक्ष पत्र देऊन तर इतर नातेवाईकांना टपालाद्वारे पत्र पाठवून मतदान करण्याबाबत हट्ट धरतील.

# 'होम पिच'वर महाविकास आघाडीला 'सेट बॅक'

## माजी महापौर योगेश बहल 'ऑन ॲक्शन मोड' : आमदार आण्णा बनसोडे यांची ताकद वाढली

**पिंपरी | प्रतिनिधी**

संत तुकाराम नगर येथे होणाऱ्या एकूण मतदानापैकी ७५ टक्के मतदान हे राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार अण्णा बनसोडे यांना होईल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष माजी महापौर योगेश बहल यांनी व्यक्त केला. त्यामुळे महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ. सुलक्षणा शिलवंत यांना 'होम पिच'वर मोठा 'सेट बॅक' बसेल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.



पिंपरी विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार अण्णा बनसोडे यांच्या प्रचारार्थ संत तुकाराम नगर भागामध्ये पदयात्रा काढण्यात आली यावेळी बहल बोलत होते. यावेळी भाजप नेते व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, शिक्षण मंडळाचे माजी उपाध्यक्ष माणिकराव अहिरराव, ज्येष्ठ नेते नंदू कदम, माजी नगरसेविका सुजाता पालांडे, माजी नगरसेवक व कामगार नेते यशवंत भोसले, वसंत शेवडे, नारायण बहिरवाडे, जितेंद्र ननवरे, मोहम्मद भाई पानसरे, विजय कापसे, अमिना पानसरे, बबनराव गाढवे, शाम लांडे, संतोष कुदळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष फजल शेख, तुकाराम पडवळ, जयदेव अक्कलकोटे, मायला खत्री, सुनील पालांडे, प्रतिभा जवळकर, निलेश आष्टेकर, राष्ट्रवादी युवती शहराध्यक्ष वर्षा जगताप, ज्ञानेश्वर कांबळे, सतीश लांडगे, हेमंत मोरे, किरण सुवर्णा, संजय अवसरमल, रविंद्र ओव्हाळ, तुकाराम बजबळकर, रमेश चिमूरकर, शिवसेनेचे राजेश वाबळे, दीपक पाटील, दिनेश पाटील, मंगेश धाडगे, अजय चव्हाण, संपत पाचुंदकर, दयानंद पेरकर, राखी धर, राहुल खाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

भाजप नेते व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे म्हणाले की, संत तुकाराम नगर मध्ये महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे. त्यामुळे अण्णा बनसोडे हे होणाऱ्या मतदानापैकी ७५ ते ८० टक्के मतदान घेऊन विजयी होतील हे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल यांचे भाकीत खरे ठरणार आहे.

**75 ते 80 टक्के मतदान आण्णांना होणार..**

**» यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल म्हणाले, की आमदार अण्णा बनसोडे यांच्या प्रचारानिमित्त प्रसन्न वातावरण संत तुकाराम नगर मध्ये निर्माण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना, आरपीआय व मित्र पक्षांचे सर्व कार्यकर्ते न भूतो न भविष्यती अशा पद्धतीने आज एकत्र आले आहेत. हे पाहता संत तुकाराम नगर मध्ये होणाऱ्या एकूण मतदानापैकी ७५ टक्के मतदान हे अण्णा बनसोडे यांना होऊन ते प्रचंड मतांनी विजयी होतील, असा विश्वास बहल यांनी व्यक्त केला.**

# चिंचवडला मतदारसंघात उभारला जाणार 'डेव्हलपमेंट' मनोरा

## मतदार संघातील लाडक्या बहिणींचा आशीर्वाद माझ्या पाठीशी : शंकर जगताप यांना विश्वास

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात मागील पाच वर्षात जवळपास एक लाखापेक्षा अधिक मतदारांची भर पडली आहे. या वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात नागरिकांना मूलभूत सुविधा निर्माण करून देण्यावर मी भर देणार आहे. या मूलभूत सुविधा मिळाल्या तरच खऱ्या अर्थाने मतदारसंघाचा सर्वांगीण विकास होण्यास वेळ लागणार नाही; असा विश्वास महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनी दिले.



चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांचा रावेत - किवळे, मामुर्डी परिसरात जोरदार प्रचार दौरा संपन्न झाला. या पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होत नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जागोजागी फुलांच्या वर्षावात आणि फटाक्यांची आतिषबाजी करून जगताप यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

प्रचाराचा शुभारंभ माळवाडी, आदर्श नगर, भीमाशंकर नगर, दत्तनगर, श्रीनगर, बाबदेव नगर, एम बी कॅम्प, विकास नगर, शिंदे पेट्रोल पंप, वीर बाबाचौक, साईनगर, राऊत नगर, मामुर्डी, आदर्श नगर, सिद्धार्थ नगर, श्री बाप देव महाराज मंदिर, किवळे गावठाण, समीर लॉस येथील सिल्वर लँड सोसायटी, मुकाई चौक येथील कोहिनूर सोसायटी, सिलेस्टिन सोसायटी, सिल्वर ग्रासिया सोसायटी, चंद्रभागा कॉर्नर, सिल्वर गार्डनिया सोसायटीमध्ये शंकर जगताप यांनी नागरिकांच्या गाठीभेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला.

यावेळी शंकर जगताप यांनी रावेत - किवळे परिसरातील मतदारांशी संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी समजून घेत, समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. पदयात्रेत नागरिकांनी "कहो दिल से; महायुती फिरसे", "शंकर जगताप तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है" अश्या घोषणा देत परिसर दणदणून सोडला होता.

या दौऱ्यात रावेत गावात झालेल्या बैठकीला सरपंच बाळासाहेब भोंडवे, मधुकर भोंडवे, नंदकुमार भोंडवे, धोंडे मामा भोंडवे, सतीश भोंडवे, तानाजी भोंडवे, दशरथ भोंडवे, राजेंद्र भोंडवे, विजय नाना भोंडवे, विलास भोंडवे, दीपक भोंडवे, पोपट भोंडवे, सोमनाथ भोंडवे, सुरेश तात्या भोंडवे, तुषार भोंडवे, शांताराम भोंडवे, बाबाजी तरस, संदीप भोंडवे, कुणाला भोंडवे, रामभाऊ भोंडवे, शैला पाचपुते, पुष्पा शेळके, पौर्णिमा पालेकर, वंदना जाधव आदी या वेळी उपस्थित होते.

तर पदयात्रेत माजी नगरसेविका प्रज्ञा खानोलकर, गणेश झेंडे, अनिल जगताप, धर्मपाल तंतरपाळे, बाळासाहेब तरस, गौतम गायकवाड, दीपक भोंडवे, माजी सरपंच सुदाम तरस, निलेश तरस, राजेंद्र तरस, बापू कातळे, दादा तरस, दिलीप राऊत, बिट्टू लांगे, नवनाथ लोखंडे, सुधीर साळुंखे, सुमित तरस, बाबाजी तरस, दशरथ साळुंखे, चंद्रकांत तरस, गौरव तरस, नवनाथ जांभुळकर, दत्ता काटकर, काका तरस, मोरेश्वर तरस, दिलीप कडलक, सुनील गायकवाड, संतोष मस्के, पूनम मस्के, करण सौदे, लखन गांधी, इंद्रपाल ऋतू, लखन आगळे, रितेश जाधव यांच्यासह युवा कार्यकर्ते, महिला भगिनी, जेष्ठ नागरिक, मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> चिंचवड विधानसभा मतदारसंघात स्व. लक्ष्मणभाऊ आणि आमदार अश्विनीताई यांच्या माध्यमातून आणलेली विकासाची गंगा अशीच अविरत सुरू राहण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करणार आहे. त्यासाठी सर्वप्रथम नागरिकांचे मूलभूत प्रश्न सोडविण्यावर माझा भर असेल. कारण तळागाळातील नागरिकांचा विकास हेच महायुती सरकारचे सूत्र आहे. आणि त्याविचारधारेनुसारच मी तुमच्या विकासासाठी कटिबद्ध आहे.
>
> **- शंकर जगताप, महायुतीचे उमेदवार.**

# पुरंदर-हवेलीत भाजपचा विजय शिवतारेंना पाठिंबा

## महायुतीच्या अधिकृत उमेदवाराचा संभ्रम दूर : झेंडेंना नेत्यांचे फोटो, पक्षचिन्ह, नाव वापरण्यास मनाई

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने शिवसेनेचे उमेदवार विजय शिवतारे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. महायुतीचे अधिकृत उमेदवार विजय शिवतारे हेच असल्याचे स्पष्ट झाल्याने उमेदवारासंदर्भात पसरविण्यात येणार संभ्रम यामुळे दूर झाला आहे. संभाजी झेंडे यांनी शिवसेना तसेच भाजपच्या नेत्यांचे फोटो, पक्षचिन्ह आणि नाव वापरू नये, असे दोन्ही पक्षाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.



दिवे (ढुमेवाडी) येथे भाजपचे महाराष्ट्र प्रभारी सी. टी. रवी यांनी भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची एकत्रित बैठक घेऊन हा निर्णय जाहीर केला. या वेळी भाजप प्रभारी सी. टी. रवी, केंद्रीय निरीक्षक संजय मिस्कीन, जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे, माजी आमदार अशोक टेकवडे, बाबाराजे जाधवराव, जालिंदर कामठे, पंडित मोडक, हवेलीचे तालुकाध्यक्ष संदीप हरपळे, पुरंदर तालुकाध्यक्ष नीलेश जगताप, शेखर वढणे, सासवड शहर अध्यक्ष संतोष जगताप, जेजुरी शहर अध्यक्ष गणेश भोसले यांच्यासह भाजपचे शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

या वेळी भाजप प्रभारी सी. टी. रवी म्हणाले, भाजप आणि शिवसेना ही नैसर्गिक युती आहे. या मतदारसंघात भारतीय जनता पक्ष आपला नैसर्गिक मित्र असलेल्या शिवसेनेसोबत म्हणजेच विजय शिवतारे यांच्याच पाठीशी भक्कमपणे उभा आहे. राष्ट्रवादीचे उमेदवार झेंडे यांनी संभ्रम निर्माण करू नये. कार्यकर्त्यांनी गावागावात याबाबत जनजागृती करून शिवतारे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणावे.

झेंडे यांच्या प्रचार साहित्यांवर शिवसेना आणि भाजपच्या नेत्यांचे फोटो, चिन्ह आणि नाव छापल्याचे निदर्शनास आल्यानंतर भाजपचे तालुकाध्यक्ष नीलेश जगताप आणि शिवसेनेचे हरिभाऊ लोळे यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. झेंडे यांनी यापुढे शिवसेना आणि भाजपच्या नेत्यांचे फोटो, चिन्ह आणि नाव वापरल्यास गुन्हे दाखल करावेत, असे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना कळवले आहे.

### झेंडे यांनी नवाब मलिकांचा आदर्श घ्यावा : अतुल म्हस्के

**»** नवाब मलिक यांनी स्वतः घोषित करून मी महायुतीचा उमेदवार नसून राष्ट्रवादी अजित पवार गटाचा उमेदवार आहे, हे मर्दासारखे जाहीर केले. झेंडे यांच्यावर वाईट वेळ आलेली असून त्यांना सेना-भाजपच्या लोकांना न विचारता त्यांचे नाव आणि फोटो वापरावे लागत आहेत. त्यांनी नवाब मलिक यांचा आदर्श घेऊन मैदानात यावे, असे माजी सभापती अतुल म्हस्के म्हणाले.

# पुणेकरांनी अनुभवला धगधगता इतिहास

## अभिवाचनात्मक कार्यक्रमाने 'वंदे मातरम्' जागराचा शुभारंभ : पुणेकरांना रोमांचक अनुभव

**पुणे | प्रतिनिधी**

'वंदे मातरम्' निर्मितीचे १५० वे वर्षे सुरू झाल्याचे निमित्त साधून 'वंदे मातरम् १५०' या अभिवाचनात्मक दृकश्राव्य विशेष कार्यक्रमाचे शुक्रवारी (दि. ८) भरत नाट्य मंदिरात आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी पुणेकरांनी हा रोमांचकारी अनुभव घेतला. भारतीय इतिहास संकलक समितीच्या माध्यमातून वंदे मातरम् सार्ध शती समारोह समितीतर्फे राष्ट्रीय पातळीवर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.



या उपक्रमांचा शुभारंभ अभिवाचनाच्या कार्यक्रमाने झाला. जन्मदा प्रतिष्ठान निर्मित, मल्हार प्रॉडक्शन प्रकाशित आणि ग्राहक पेठ आयोजित या कार्यक्रमाची संकल्पना आणि संहिता लेखन वंदे मातरम्चे संशोधक-अभ्यासक मिलिंद सबनीस यांचे तर दिग्दर्शन प्रसाद कुलकर्णी यांचे आहे. ज्येष्ठ अभिनेते प्रदीप फाटक, अभिषेक खेडकर आणि अवंती लोहकरे यांनी प्रभावीपणे अभिवाचन केले. दृकश्राव्य माध्यमाचे संगीत अजय पराड यांचे होते तर अपर्णा केळकर, पद्मजा लामरुड, पार्थ उमराणी, देवव्रत भातखंडे यांनी पार्श्वगायन केले आहे. दृश्य संकलन महेश लिमये यांचे आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात देशभूमीला मातृरूपात पाहताना द्रष्टे कवी बंकिंमचंद्र चट्टोपाध्याय यांनी जाज्वल्यपूर्ण शब्दांमध्ये रचलेले वंदे मातरम् हे गीत देशवासियांचे हृदय जिंकेल या विश्वासाने जगासमोर आणले. भारत मातेला ब्रिटिशरूपी शत्रूचे मर्दन करणाऱ्या देवी रूपात पाहण्याची इच्छा बाळगून या गीताची रचना २४ ओळी व सहा कडव्यात सहजतेने जणू प्रकटच झाली. बंकिंमचंद्र चट्टोपाध्याय यांनी मातृभूमीचे सुजलाम् सुफलाम् असे दर्शन घेतले त्याच प्रमाणे मातृभूमीचे पिडीत आणि दु:खी रूपही पाहिले.

यातूनच त्यांच्या लेखणीतून बाहेर पडलेला मातृभूमीचा जयघोष हा युद्धमंत्रच होता. वंदे मातरम् या शब्द उच्चारणावरही तत्कालीन इंग्रजी शासनाने बंदी घातली एवढी महती वंदे मातरम् या शब्दाला आणि गीताला लाभली. वंदे मातरम् गीताचे पहिले जाहीर गायन, वंदे मातरम् शब्दाचा सामाजिक प्रभाव, कला क्षेत्रातही वंदे मातरम् गीताला मिळालेले स्थान, अनेक गायक व संगीतकारांना या गीताची पडलेली भुरळ, स्वातंत्र्य मिळण्याची आशा निर्माण झालेली असताना वंदे मातरम् गीतास झालेला विरोध, वंदे मातरम् हे राष्ट्रगीत न होता राष्ट्रीय गीत होऊन लाभलेला दर्जा असे विविध टप्पे अभिवाचन आणि दृकश्राव्य माध्यमातून पुणेकरांसमोर मांडण्यात आले. कार्यक्रमाची सांगता पंडित भीमसेन जोशी यांनी देस रागात गायलेल्या वंदे मातरम्ने झाली.

वंदे मातरम् हे गीत फक्त शब्दरूपी नसून हा प्रचंड मोठा उर्जा स्रोत आहे, आजच्या सामाजिक स्थितीत प्रत्येकाच्या मुखी वंदे मातरम् चा गजर होणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा वंदे मातरम्चे अभ्यास-संशोधक मिलिंद सबनीस यांनी व्यक्त केली. वंदे मातरम् या गीताचा इतिहास जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचावा या करता मिलिंद सबनीस ध्यास घेऊन कार्य करीत आहेत, असे मत इतिहासाचे अभ्यासक आनंद हर्डीकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागतपर प्रास्ताविक संजय भंडारे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, भारत माता आणि बंकिंमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. हर्डीकर यांचा सत्कार अरुणचंद्र पाठक यांनी केला.